आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१८ सप्टेंबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात गणेशोत्सवाच्या पर्वाची गणेश विसर्जनाने सांगता / पुण्यात अद्याप विसर्जन मिरवणुका सुरु

- साडेबारा टक्के सीमाशुल्क भरुन आयात केलेलं खाद्यतेल ग्राहकांना किरकोळीत वाढीव दराने विकू नये असं केंद्रसरकारचं खाद्यतेल विक्रेत्यांना आवाहन

- एनपीएस- वात्सल्य योजनेचं केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**आणि**

- गणेशविसर्जनाच्या वेळी ८ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

गणेशोत्सवाच्या चैतन्यपर्वाची काल गणेश विसर्जनानं सांगता झाली. राज्यात सर्वत्र ढोल ताशांच्या गजरात, लेझीमच्या तालात, गुलालाची उधळण करत आणि पुढच्या वर्षी लवकर या अशी साद घालत, भाविकांनी लाडक्या बाप्पांना भावपूर्ण निरोप दिला. दहा दिवसांच्या घरगुती गणेश मूर्तींचंही विसर्जन काल करण्यात आलं. मुंबईत मोठ्या गणेशमूर्तींचं विसर्जन आज सकाळपर्यंत सुरु होतं. त्याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड- व्हॉईसकास्ट – अंकिता आपटे**

*(मुंबईत गणेशोत्सवाची सांगता दरवर्षीप्रमाणे उत्साहात झाली. अनंतचतुर्दशीच्या दिवशी शहरातले समुद्रकिनारे लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी आलेल्या गर्दीने फुलून गेले होते. घरगुती आणि सार्वजनिक मिळून सुमारे सदतीस हजार मूर्तींचं विसर्जन झालं.  मोठमोठ्या गणेशमूर्ती मिरवणुकीने वाजत गाजत यंत्रांच्या सहाय्याने विसर्जित करण्यात आल्या. मुंबईच्या प्रसिद्ध लालबागच्या राजाचं विसर्जन आज सकाळी ११ च्या सुमारास संपन्न झालं. अनंत चतुर्दशीनिमित्त गिरगाव चौपाटीवर गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी आलेल्या गणेशोत्सव मंडळाच्या मिरवणुकींवर राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी पुष्पवृष्टी केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त आणि प्रशासक भूषण गगराणी, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, देवेन भारती आदी यावेळी उपस्थित होते. मान्यवरांनी यावेळी प्रशासनाच्या वतीने चौपाटीवर उभारण्यात आलेल्या विविध मंडपांना भेट देऊन गणरायांची आरती केली. तसंच देश विदेशातून आलेल्या गणेश भक्तांशी संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या. मिरवणुकीच्या दृष्टीने वाहतुकीचं चोख नियमन करण्यात आलं होतं.)*

**पुण्यात** विसर्जन मिरवणुका अजूनही सुरु आहेत.  मिरवणुकांमुळे अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी झाली तसंच अनेक ठिकाणी मार्ग वळवण्यात आले होते. सकाळपर्यंत १७१ सार्वजनिक गणेश मंडळांच्या मूर्तींचं विर्सजन झालं होतं.

राज्यात इतरत्रही गणेशविसर्जन शांततेत आणि उत्साहात झालं. त्याच्या बातम्या आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांनी दिल्या आहेत.

**नांदेड** जिल्ह्यात २५ हजार सार्वजनिक गणेश मंडळ तसंच घरगुती गणपतीचे विसर्जन करण्यात आलं.  नांदेड शहरात २६ ठिकाणी महापालिकेच्या वतीनं श्री गणेश मूर्ती संकलन केंद्र स्थापन करण्यात आली होती. निर्माल्य

संकलनासाठीही स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती. मोठ्या गणेश मूर्तींचे विसर्जन हे शहरानजीक झरी तलावात करण्यात आलं. तसंच पासदगाव, आसना, नावघाट इथंही कृत्रिम तलावाची निर्मिती करण्यात आली होती. रात्री अकरा वाजेपर्यंत बहुतांश गणेश मंडळाच विसर्जन पार पडले होते. विसर्जन मिरवणुकात डीजे, लेझर बिमवर बंदी असल्याने मिरवणुकांमध्ये ढोल ताशांचा वापर करण्यात आला. शहरात ठिकठिकाणी विविध संस्था, गणेश मंडळांच्या वतीनं अन्नदानही करण्यात आलं.

**नंदुरबार** जिल्ह्यातल्या दादा गणपती आणि बाबा गणपती या मानाच्या गणपतींच्या भेटीचा सोहळा काल झाला. काल रात्री साडे बाराच्या सुमारास दादा गणपती आणि बाबा गणपती यांचे रथ जळका बाजार परिसरात आल्यानंतर परंपरेप्रमाणे आरती करण्यात आली. हा सोहळा पाहण्यासाठी नंदुरबार जिल्ह्यासह गुजरात आणि मध्यप्रदेशातल्या भाविकांचीही उपस्थिती होती.

**सांगली** जिल्ह्यातील मिरज इथं अनंत चतुर्दशीच्या मिरवणुकीला अनेक वर्षांची परंपरा असून मिरवणूक पाहण्यासाठी महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यातून अनेक गणेश भक्त उपस्थित होते. भव्य स्वागत कमानी आणि आकर्षक गणेश मूर्ती गणेश भक्तांचं लक्ष वेधून घेत होत्या. यावेळी एक हजारहून अधिक पोलिस तैनात करण्यात आले होते. यावर्षी शहरातील अनेक मंडळांनी रक्तदान, आरोग्य शिबीर तसंच अन्नदान यासारखे उपक्रम राबविले. काही गणेश मूर्ती गणेश तलावात तर काही कृष्णा नदीत विसर्जित

करण्यात आल्या. मिरवणुकीच्या मार्गावर राजकीय पक्षांनी गणेश मंडळांचं स्वागत केलं. मिरवणुकीमुळे मिरजेतील वाहतूक मार्गात बदल करण्यात आला होता. रात्री उशिरापर्यंत मिरवणुका चालू होत्या. २०० हून अधिक सार्वजनिक गणेश मूर्तींच विसर्जन करण्यात आलं.

**नाशिक** मधे वाकडी बारव येथे नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे यांनी मुख्य विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ केला यावेळी आमदार देवयानी फरांदे यांच्यासह इतर राजकीय नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते. ढोल ताशांच्या गजरात निघालेल्या अनेक मंडळांच्या मिरवणुकीत आदिवासी कलापथकं, मर्दानी खेळ तसेच गुलालवाडीचे लेझीम पथक आकर्षण ठरले. नाशिक महापालिकेचा मानाचा गणपती मिरवणुकीच्या अग्रभागी होता.

दरम्यान, **गोदावरी आणि उपनद्यांमध्ये** मूर्तींचे विसर्जन होऊ नये याच्यासाठी **नाशिक महापालिका** आणि विविध संस्थांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही विसर्जित मूर्ती दान स्वीकारण्याचा उपक्रम राबविण्यात आला. त्याला यंदाही चांगला प्रतिसाद मिळाला. नाशिक महापालिकेच्या सहा विभागात मिळून एक लाख ८१ हजार १५७ मूर्तींचे संकलन रात्री नऊ वाजेपर्यंत झालं होतं. त्यामुळे गोदावरी नदीचं प्रदूषण टाळण्यास मदत झाली आहे. याशिवाय निर्माल्याचंही संकलन करण्यात आलं.

**<><><><><>**

साडेबारा टक्के सीमाशुल्क भरुन देशात आणलेलं खाद्यतेल ग्राहकांना किरकोळीत वाढीव दराने विकू नये असं केंद्रसरकारने खाद्यतेल विक्रेता संघटनांना सांगितलं आहे.  हा साठा पूर्णपणे संपत नाही  तो पर्यंत किरकोळ खाद्यतेलाचे भाव वाढवू नयेत असं सरकारनं स्पष्ट केलं आहे. खाद्यतेलाच्या दरनिश्चितीबाबत अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाचे सचिव संजीव चोप्रा यांच्या अध्यक्षेतखाली काल नवी दिल्ली इथं एका बैठकीत चर्चा झाली.

देशांतर्गत तेलबिया उत्पादकांना चांगला भाव मिळावा या दृष्टीनं केंद्रसरकारने विविध खाद्यतेलांच्या आयातीवरचं सीमाशुल्क वाढवून २० टक्केपर्यंत वाढवण्याचा निर्णय अलिकडेच घेतला. गेल्या शनिवारपासून म्हणजे १४ सप्टेंबरपासून लागू झाला आहे. त्यामुळे प्रक्रीया न केलेल्या खाद्यतेलावर साडे सत्तावीस टक्के तर रिफाईन्ड पाम, सूर्यफूल आणि सोयाबीन तेलाच्या आयातीवर साडेबारा टक्क्यांऐवजी साडे बत्तीसटक्के सीमाशुल्क लागू झालं आहे. मात्र जुन्या दराने आयात केलेल्या तेलाचे दर किरकोळ विक्रीसाठी वाढवू नये असं सरकारने सांगितलं.  आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर सध्या जुन्या दराने शुल्क भरुन आयात केलेल्या खाद्यतेलाचा सुमारे ३० लाख टन साठा उपलब्ध असून तो पुढचे ४५ ते ५० दिवस पुरेल याची सरकारला जाणीव असल्याचं अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाच्या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण आज नवी दिल्लीत एनपीएस- वात्सल्य योजनेचा प्रारंभ करणार आहेत. या योजनेसाठीचा ऑनलाइन मंच आणि पुस्तिकेचं लोकार्पणही त्या करतील, तसंच या योजनेच्या अल्पवयीन लाभार्थ्यांना कायमस्वरूपी निवृत्ती खाते क्रमांक कार्डांचं वाटपही करतील. या पार्श्वभूमीवर राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या वतीनं मुंबईतल्या अस्मिता सामाजिक, सांस्कृतिक आणि सार्वजनिक संस्थेत कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यात विद्यार्थ्यांना प्राण कार्डांचं वितरण केलं जाईल. एनपीएस- वात्सल्य योजनेद्वारे पालकांना आपल्या मुलांच्या भविष्यासाठी निवृत्तीवेतन खात्यात गुंतवणूक करता येईल.

<><><><>

पर्यावरण रक्षण, शाश्वत विकास आणि हरित महाराष्ट्रासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या कामाबद्दल जागतिक कृषी मंचाच्या वतीनं आज त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. त्यांच्यासोबतच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनाही २० देशांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत सन्मानित केलं जाणार आहे.

<><><><>

आत्ताच हाती आलेल्या बातमीनुसार चंद्रयान ४ मोहिमेच्या विस्ताराला केंद्रीय मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. चंद्रावर मानव

पाठवण्यासाठी आवश्यक तयारी करणे, त्यासाठी यान चंद्रावर उतरवणे आणि त्यानंतर त्याला पृथ्वीवर परत आणणं या मोहिमेचा भाग आहे. शुक्र मोहिमेलाही केंद्र सरकारनं आज मंजुरी दिली. सुधारित गगनयान मोहिम तसंच भारतीय अंतराळ स्थानकालाही आज मंजुरी मिळाली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जागतिक पर्यावरण दिनी सुरु केलेल्या ‘एक पेड़ माँ के नाम’ या अभियानाअंतर्गत माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आजपर्यंत सुमारे सात हजार झाडं लावली आहेत. देशभरातल्या शहरी आणि ग्रामीण मिळून विविध कार्यालयात हे अभियान राबवण्यात आलं. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यापासून अभियानात योगदान द्यायला सुरुवात केली. कालपासून सुरु झालेल्या स्वच्छता ही सेवा अभियानातही माहिती आणि प्रसारण मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या कार्यालयांमधे वृक्षलागवडीचं काम हाती घेतलं आहे. आकाशवाणी मुंबईच्या नवीन प्रसारण भवनातही हे अभियान राबवण्यात येत आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातलं मतदान आज सकाळी ७ वाजल्यापासून शांततेत सुरु झालं. दुपारी १ वाजेपर्यंत  ४१ पूर्णांक १७ शतांश मतदान झाल्याचं वृत्त आहे. अनंतनाग, पुलवामा, कुलगाम, शोपियाँ, दोडा, किश्तवाड आणि रामबन या सात जिल्ह्यांमधल्या

मिळून २४ विधानसभा मतदारसंघांमधे मतदान होत आहे. ९० अपक्षांसह एकूण २१९ उमेदवार या टप्प्यात नशीब आजमावत आहेत.

**<><><><><>**

गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान राज्यभरात विविध ठिकाणी झालेल्या दुर्घटनांमध्ये ८ जणांचा मृत्यू झाला. धुळे शहराजवळ चितोड गावात विसर्जनाच्या मिरवणुकीत ट्रॅक्टरखाली आल्यानं काल तीन बालकांचा मृत्यू झाला, तर इतर सहा जण जखमी झाले. धुळे शहरात काल संध्याकाळी दोन सख्ख्या भावांचा पांझरा नदीत बुडून मृत्यू झाला. नाशिकजवळच्या पाथर्डी इथं नदीत गणपती विसर्जनासाठी गेलेल्या दोन तरुणांचा बुडून मृत्यू झाला तर अन्य एका घटनेत चुंचाळे गावाजवळ एक जण डोहात बुडाला. त्याचा शोध सुरू आहे. अमरावतीच्या ईसापूर शहापूर इथं गणपती विसर्जनासाठी गेलेले तिघे पूर्णा नदीत वाहून गेले. त्यातल्या एकाचा मृतदेह मिळाला असून इतर दोघांचा शोध सुरू आहे. नीरा नरसिंहपूर इथल्या नदीपात्रात गणेश विसर्जनासाठी गेलेल्या मुलाचा शोध अद्याप जारी आहे.

***//<><><><><>//***